# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उपायुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 3रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828-228 ई-मेल आयडी dmc4@mbmc.gov.in


जा.क्र.मनपा/उपा-४/ ९३६ /२०२६-२७ दि. २२/०९/२०२६

प्रति,
**सिस्टीम मॅनेजर**
**माहिती व तंत्रज्ञान विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विषयः- गणेशोत्सवाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी करावयाच्या बाबी.

संदर्भः- १) महाराष्ट्र शासन, इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुबई यांचे दिनांक ०८/०९/२०२६ रोजीचे पत्र.

२) दि. २२/०९/२०२६ रोजीचे जिल्हानियोजन अधिकारी ठाणे यांची V.C. (०२.०० वा.)

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या पत्रान्वये महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवाचा वारसा जतन करणे तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची कला, संस्कृती, परंपरा, लोकजीवन व सामाजिक एकोपा यांचा व्यापक प्रचार व प्रसार करण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत शासनामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहे. त्या अनुषंगाने **गणेशोत्सवाशी संबंधित पारंपारिक कला, संस्कृती व पर्यावरणपूरक उपक्रमांबाबत तसेच Bappa.org या संकेतस्थळावर घरगुती गणपती व सार्वजनिक गणेश मंडळांची नोंदणी करण्याबाबत महापालिका अधिकृत संकेतस्थळावर माहिती अद्यावत करुन आपल्या संपर्कातील समूहामध्ये प्रसारीत करण्यात यावी.** गणेशोत्सवातील वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक पध्दती, कला सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम इत्यादींची माहिती उपलब्ध असल्यास त्याचा प्रचार व प्रसार करण्यात यावा.

सदर बाबीस प्राधान्य देऊन आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(कविता बोरकर)**
**उप-आयुक्त (पर्यावरण)**
**तथा नोडल अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत माहितीस्तव :-
१) मा. आयुक्त
२) मा. अति. आयुक्त (१)
३) मा. अति. आयुक्त (२)

जा.क्र. मंत्री/ई.मा.तं.कृ.बु.व.सां.का/व्हीआयपी नोट/-------/२०२६
दि. 08/09/2026 347

मंत्री
महाराष्ट्र राज्य


**मंत्री**
इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञान आणि
कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक : 08 SEP 2026

**विषय : गणेशोत्सवाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी करावयाच्या बाबी.**

महाराष्ट्राची वैभवशाली सांस्कृतिक अस्मिता असलेल्या गणेशोत्सवाला राज्य शासनाने **'राज्य महोत्सव'** म्हणून दर्जा दिला आहे. महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेला जागतिक स्तरावर नेणे तसेच महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला **युनेस्कोचा वारसा दर्जा व यासंदर्भातील अन्य जागतिक मानांकने** प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सदर मोहीम ही केवळ एका विभागाची जबाबदारी न राहता शासनाच्या सर्व विभागांनी एकसंघ, एकत्रित, समन्वित व सर्वसमावेशक पद्धतीने राबविणे आवश्यक आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राचे केवळ सांस्कृतिक वैभव नसून तो अध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक तसेच उद्यमशीलतेला चालना देणारी व्यापक लोकचळवळ आहे. त्यामुळे या उत्सवाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी एखादा मर्यादित शासकीय कार्यक्रम, इव्हेंट किंवा उत्सवी सप्ताह आयोजित करण्यापुरते प्रयत्न मर्यादित न ठेवता, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर किमान सहा महिने ते वर्षभर विविध माध्यमांतून सातत्याने उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

या माध्यमातून गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राची कला, संस्कृती, परंपरा, ज्ञान, लोकजीवन, हस्तकला, उद्यमशीलता आणि सॉफ्ट पॉवर यांचा व्यापक प्रसार व प्रचार करण्यात यावा. या उपक्रमामध्ये समाजातील लहान-थोर तसेच सर्व घटकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यात यावा.

महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे जागतिक संस्थांसाठी दस्तऐवजीकरण करणे व या उत्सवाशी संबंधित परंपरा, कला, चालीरीती व सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पुरातत्त्व संचालनालयामार्फत **Bappa.org** हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या अधिकृत मंचावर महाराष्ट्रातील तसेच देशभरातील आणि **३५ हून अधिक जागतिक शहरांमधील** गणेशोत्सवाशी संबंधित घरगुती व सार्वजनिक परंपरा, गणेशमूर्ती स्थापना, सजावट, हस्तकला, चालीरीती, कला सादरीकरण, खाद्यपरंपरा, आठवणी, छायाचित्रे व व्हिडिओ नागरिकांना WhatsApp च्या माध्यमातून नोंदविता व अपलोड करता येणार आहेत. जनतेच्या सहभागातून तयार होणारा हा महाराष्ट्राच्या गणेशपरंपरेचा अधिकृत व कायमस्वरूपी सांस्कृतिक दस्तऐवज ठरणार आहे.

ही मोहीम खऱ्या अर्थाने व्यापक लोकचळवळ बनविण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे **प्रत्यक्ष (Offline) तसेच डिजिटल (Online) उपक्रम तातडीने राबविण्यात यावेत :**

**१. प्रचार साहित्याचे प्रदर्शन, होर्डिंग्ज व डिजिटल प्रसिद्धी**

जा.क्र. मंत्री/ई.मा.तं.कृ.बु.व.सां.का/व्हीआयपी नोट/847/२०२६
दि. 08/09/2026

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञान आणि**
**कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य**
महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 08 SEP 2026

**अ)** सदर उपक्रमासाठी EFlag या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून, या संस्थेमार्फत आवश्यक प्रचार साहित्य व कंटेंट उपलब्ध करून देण्यात येईल.

**ब)** आपल्या कार्यक्षेत्रातील प्रमुख सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, ऐतिहासिक मंदिरे, जिल्हाधिकारी कार्यालये, महानगरपालिका/नगरपरिषद प्रभाग कार्यालये, सेतू/नागरी सुविधा केंद्रे (CFC), बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच प्रमुख रस्त्यांवरील मोक्याच्या ठिकाणी होर्डिंग्ज, पोस्टर्स व स्टँडीज (WhatsApp QR Code सहित) तातडीने प्रदर्शित करण्यात याव्यात.

**क)** जिल्हा प्रशासन, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या अधिकृत X/Twitter, Facebook, Instagram इत्यादी सोशल मीडिया पेजेस, अधिकृत संकेतस्थळे तसेच डिजिटल स्क्रीन्सवर सदर उपक्रमाचे अधिकृत प्रचार साहित्य व व्हिडिओ यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

**२. 'घरोघरी बाप्पा' — नागरिकांना कथा व परंपरा नोंदविण्याचे आवाहन**

सार्वजनिक गणेश मंडळांव्यतिरिक्त आपल्या कार्यक्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण, पारंपरिक व ऐतिहासिक वारसा असलेल्या घरगुती गणेशोत्सवाची प्रतिष्ठापना, कौटुंबिक विधी, कला, सजावट, पारंपरिक पद्धती, खाद्यपरंपरा व अन्य वैशिष्ट्यपूर्ण बाबी Bappa.org वर नोंदविण्यासाठी नागरिकांना स्थानिक पातळीवर व्यापक आवाहन करण्यात यावे.

नोंदणी करणाऱ्या नागरिकांना शासनाचे अधिकृत **'Digital Cultural Preserver Certificate'** देण्यात येणार आहे.

**Bappa.org** हे पोर्टल जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवून लोकप्रिय करण्यासाठी आपल्या स्तरावरून नावीन्यपूर्ण व प्रभावी उपक्रम राबविण्यात यावेत.

**३. कला व कलापरंपरांचे दस्तऐवजीकरण**

गणेशोत्सवाचा कला व लोकपरंपरांशी अत्यंत जवळचा संबंध असल्याने आपल्या कार्यक्षेत्रातील मान्यवर कलाकार, लोककलावंत, पारंपरिक कलापरंपरा तसेच ६४ कलांशी संबंधित कला व कौशल्ये यांची माहिती Bappa.org वर नोंदविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**४. स्थानिक स्वराज्य संस्था व गृहनिर्माण संस्थांचा सहभाग**

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था (Co-operative Housing Societies), निवासी कल्याणकारी संघटना (RWAs), ग्रामपंचायती तसेच स्थानिक बचत गट यांच्या WhatsApp समूहांवर Bappa.org ची प्रचार लिंक व QR Code प्रसारित करून नागरिकांचा व्यापक सहभाग नोंदवून घेण्यात यावा.

जा.क्र. मंत्री/ई.मा.तं.कृ.बु.व.सां.का/व्हीआयपी नोट/347/२०२६
दि. 08/09/2026

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 08 SEP 2026

यासाठी संबंधित अधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक त्या सूचना तातडीने देण्यात याव्यात.

**५. जिल्हा संपर्क अधिकारी / नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती**

सदर मोहिमेच्या अखंडित व प्रभावी समन्वयासाठी आपल्या कार्यालयामार्फत एका अनुभवी, वरिष्ठ व जबाबदार अधिकाऱ्याची जिल्हा नोडल अधिकारी / संपर्क अधिकारी (District Nodal Officer / POC) म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

सदर अधिकाऱ्याचे **नाव, पदनाम व WhatsApp संपर्क क्रमांक** राज्यस्तरीय मध्यवर्ती समन्वय WhatsApp समूहामध्ये समाविष्ट करण्यासाठी तातडीने कळविण्यात यावेत.

**६. जिल्हा माहिती अधिकारी व स्थानिक माध्यमांचा समन्वय**

जिल्हा माहिती कार्यालयामार्फत (DIO) स्थानिक वृत्तपत्रे, केबल नेटवर्क, स्थानिक सोशल मीडिया पेजेस, रेडिओ तसेच अन्य उपलब्ध माध्यमांद्वारे या उपक्रमाची सातत्यपूर्ण व व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी.

तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील पारंपरिक मूर्तिकार, गणेशमूर्ती घडविणाऱ्या कार्यशाळा, कारागीर व लोककलावंत यांचे विशेष वार्तांकन करून त्यांचे छायाचित्र, व्हिडिओ व माहिती Bappa.org या मुख्य पोर्टलवर उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

**७. शुभंकर चिन्हाचा (Mascot) वापर**

जे. जे. स्कूल ऑफ आर्टने तयार केलेल्या गणेशोत्सवाच्या **शुभंकर चिन्हाचा (Mascot)** गणेशोत्सव मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच संबंधित शासकीय/अशासकीय संस्थांनी त्यांच्या प्रचार साहित्यामध्ये योग्य त्या पद्धतीने वापर करावा, यासाठी आवश्यक प्रयत्न व समन्वय करण्यात यावा.

**८. साप्ताहिक प्रगती अहवाल**

आपल्या कार्यक्षेत्रातून झालेल्या—

- Bappa.org वरील एकूण नोंदी,
- प्रत्यक्ष प्रचार उपक्रम,
- होर्डिंग्ज/पोस्टर्स/स्टँडीजची संख्या,
- QR Code चा प्रसार,
- सहभागी गणेशोत्सव मंडळे,
- सहभागी नागरिक/संस्था,
- डिजिटल प्रसिद्धीचे उपक्रम,
- लोकसहभागाची व्याप्ती,

जा.क्र. मंत्री/ई.मा.तं.कृ.बु.व.सां.का/व्हीआयपी नोट/——/२०२६ 347
दि. 08/09/2026


**मंत्री**
**इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञान आणि**
**कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक : 08 SEP 2026

याबाबतचा साप्ताहिक प्रगती अहवाल (Weekly Progress Report) संकलित करून दर सोमवारी सांस्कृतिक कार्य मंत्री कार्यालयास cultmin.office@maharashtra.gov.in या ई-मेलवर सादर करण्यात यावा.

वरील सर्व बाबींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या कार्यालयात एका अनुभवी, वरिष्ठ व जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. या कार्यासाठी सांस्कृतिक कार्य अधिकारी अथवा माहिती व जनसंपर्क अधिकारी तसेच EFlag संस्थेचे प्रतिनिधी आपल्या कार्यालयाच्या संपर्कात राहतील.

आपल्या स्तरावरून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा घेऊन त्याची अद्ययावत माहिती शासनास अवगत करण्यात यावी.

महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेचे दस्तऐवजीकरण, जतन व जागतिक पातळीवर प्रसार करण्याचे हे ऐतिहासिक कार्य आहे. त्यामुळे आपल्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्हा/महानगरपालिका प्रशासनाने सदर उपक्रमास सर्वोच्च प्राधान्य देऊन, व्यापक लोकसहभागातून तो यशस्वी करण्यासाठी आवश्यक ती तातडीची कार्यवाही करावी.

**(ॲड. आशिष शेलार)**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, (सर्व).
२. आयुक्त महानगरपालिका, (सर्व).
३. जिल्हाधिकारी, (सर्व).